# ग्रामगीतेतील महिलोन्नती संदर्भातील विचार : एक चिंतन

**डॉ. आर. आर. दिपटे,**
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर
8308107399
rajeshdipte@gmail.com

---

**सारांश :**

*आधुनिक काळात विज्ञाननिष्ठ विचारांची मांडणी करणारे सर्जनशील साहित्यिक म्हणून तुकडोजी महाराज यांचे नाव पुढे येते. ग्रामगीतेच्या माध्यमातून त्यांनी समाजातील सर्वच विषयाला स्पर्श केला असून महिलोन्नती हा त्यातील प्रमुख महत्त्वाचा धागा होय. समाजातील विषमता, अंधश्रद्धा या सोबतच कल्याणकारी योजनाची आखणीही ते करतात. शिक्षणाच्या अभावामुळे अज्ञानी, परावलंबी व हतबल झालेल्या स्त्रीयांच्या कल्याणविषयक मार्गदर्शक सूत्र त्यांच्या साहित्यातून दिसन येते. हा देश खेड्यांचा देश असला तरी तत्कालीन परिस्थिती पाहताना त्यांच्यातील अस्वस्थ मन लेखणीबद्ध होते. स्त्रीयांची विविध जबाबदारी पार पाडत असतांना संसार सुखी करण्याविषयीचे मंत्र ते विषद करतात. समान शिक्षण, समान हक्क, समान रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगार, स्पष्टवक्तेपणा, निर्भिडपणा, निर्णय प्रक्रियेतील सहभाग इ. गुणविशेष संस्कार स्त्रीयांच्या अंगी रूजविले जावेत यासाठी त्यांची भूमिका ही अतिशय आग्रही होती. समाजातील अनेक परंपरा या स्त्री जीवनाच्या विकासाच्या आड येऊ नयेत. स्त्रीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोण बदलण्याची गरज असल्याचे ते प्रतिपादन करतात. समाज सुधारणा करायची असेल, राष्ट्रविकास साधण्याचा मूलमंत्र म्हणजे स्त्रीशिक्षण होय. स्वातंत्र्योत्तर काळात या क्षेत्रात झपाट्याने काम करण्याची गरज असल्याचे त्यांच्या साहित्यात दिसून येते. महिलोन्नती ही देशोन्नती होय. असा संदेश त्यांच्या लेखणीतून दिसून येतो. देशाला आज हे विचार कृतीत आणण्यासाठी उदार मानसिकतेची गरज आहे.*

---

**प्रस्तावना :**

आधुनिक काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून विज्ञाननिष्ठ विचारांची मांडणी करणारे एक सर्जनशील साहित्यिक होते. आपल्या साहित्यातून जीवनातील निरनिराळ्या क्षेत्राबाबत त्यांनी मोलाचे चिंतन केले आहेत. राष्ट्रसंतांनी आपल्या जीवनात परिस्थितीसापेक्ष व आधुनिक मूल्यांची कास धरणारी विचारसरणी स्वीकारली आणि परखडपणे आपल्या वैचारिक भूमिकेला अनुरूप अशी साहित्य निर्मिती केली. 'ग्रामगीता' हा त्यांचा ग्रंथ ग्रामरचनेविषयी भाष्य करणारा असला तरी एका अर्थाने मानवी मूल्यांचे, समाजजीवनाचे व एकंदर आधुनिक राष्ट्राचे पुनर्मांडणी करणारे ते एक तत्त्वज्ञान आहे. वरकरणी ग्रामगीतेचा गाभा ग्रामीण प्रदेशाशी संबंधित दिसत असला तरी त्यामध्ये ग्रामरचना, मानवी व्यवहार, आधुनिक विचारसरणी, उदारमतवादी दृष्टिकोन, समानतेची शिकवण, सम्यक मानवी वर्तनव्यवहार अशा असंख्य बाबी एकरूप झालेल्या आहेत.

भारतीय समाजजीवन हे अनेक प्रकारच्या विषमतेने ग्रस्त झालेले आहे. जात, धर्म, लिंग, प्रदेश, भाषा अशा अनेक जन्माधारित बाबींमुळे मानवी जीवनात भेदभाव निर्माण होतो. वास्तविक पाहता वरीलपैकी कोणत्याही अस्मितेला प्राप्त करून घेण्यात व्यक्तीचे स्वत:चे कर्तृत्व नसते. त्यामुळे या अस्मिता खोल असून

अखंड मानवतेची अस्मिता हीच खरी अस्मिता आहे. या दृष्टीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीआपल्या संपूर्ण साहित्यात न्यायपूर्ण भूमिका घेतली आहे.

समाजात दिसणारा लिंगभाव, स्त्री–पुरुष भेदभाव म्हणजे शोषणाचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे महिलांच्या व पर्यायाने संपूर्ण समाजाच्या दृष्टिकोनातून सर्वकष परिवर्तन घडायला हवे असे तुकडोजींनी वाटते. महिलांची जीवनशैली तिची आत्मनिर्भरता, उत्पादकता, सर्जनशीलता आणि तिचे महत्त्व अशा अनेक महत्त्वाच्या दृष्टिकोनावर तुकडोजी महाराज प्रकाश टाकतात. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजींचा महिलांच्या सर्वांगीण उन्नतीबाबतचा दृष्टिकोण अभ्यासनीय आहे.

''ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण। उद्याचे राष्ट्र, आजचे संतान।
यासाठी आदर्श पाहिजेत गुरुजन। राष्ट्रनिर्माते।।''

हजारो वर्षापासून धर्म, जात, लिंगभेद परंपरेत आपल्या देशात जाणीवपूर्वक शिक्षणापासून वंचित ठेवलेला वर्ग शिकल्याशिवाय विचारप्रवण होणार नाही. शिकलेला समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात क्रांती घडवू शकतो. यासाठी तुकडोजी अत्यंत आग्रही होते. ह्या समाजाला आधार देणारा शिक्षक हा या व्यवस्थेतील महत्त्वाच्या कणा होय. यासाठी आदर्श शिक्षक हे देखील या प्रक्रियेत मोलाचे कार्य करू शकतात. त्यांची थोरवी तुकडोजी इथे विषद करतात. समाजात शिक्षणाच्या अभावामुळे मोठी विसंगती निर्माण झाली. ''भारतात ज्याला उच्च शिक्षण म्हणतात, ते इंग्रजी शिक्षण घेतलेला एक वर्ग व मुळीच शिक्षण न घेतलेला दुसरा वर्ग असे समाजात दोन वर्ग पडले.''[१]

गावागावात महिलांसाठी महिलामंडळ असावे. जेणेकरून त्यांच्यात संवाद निर्माण व्हावा आपल्या सुखदु:खाच्या भावना एकमेकांना सांगणे सहज शक्य होईल यासाठी ते म्हणतात,

''जैसी मुलांची संघटित सेना। तैसी स्त्रियांची असावी संघटना।
आपल्या सुख–दु:खाच्या भावना। प्रकटवण्या सभा–संमेलनी।।''

आजपर्यंत चार भिंतीच्या आत आपल्या भावना दडपल्या गेलेल्या स्त्रीला मोलाचे मार्गदर्शन करतात. ''महिलांना स्वावलंबी बनवून त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी ज्याप्रमाणे तुकडोजींनी महिला मंडळे स्थापन केलीत तशीच युवा पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्याकरिता १९४५ मध्ये आखाडे निर्माण केलेत.''[२]

आजचा समाज ज्या तरुणावर अवलंबून असेल तो तरुण विविध व्यसनापासून दूर असावा. गावागावात व्यसनाचे दुष्परिणाम सांगणारे फलक असावे, असे आग्रही प्रतिपादन ते करताना दिसतात. ही व्यसने समाजात, कुटुंबात अनेक संकटे उभी करतात.

आपला देश खेड्यांचा देश आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाजजीवनाचे अवलोकन अतिशय सूक्ष्म होते. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेड्यापाड्यात आमूलाग्र बदल होईल असे जे स्वप्न आपण स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी पाहिले होते, त्याचा अक्षरश: चुराडा झालेला असून खेडीच्या खेडी ओस पडत आहेत. आजही ग्रामगीतेच्या प्रचार–प्रसाराने गाव विकासाची संकल्पना रुजविल्या जाऊ शकते. यावर भाष्य करताना अभ्यासक डॉ. अशोक राणा म्हणतात की, ''भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे ग्रामगीता ही सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय राहणार आहे. अतिशय सोप्या व स्पष्ट भाषेत तिची रचना झालेली असल्यामुळे तिचा संदेश सहज जनमाणसात पोहचू शकतो. समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम या नात्याने आपण या ग्रंथाकडे पाहिले तर आपल्या इच्छित कार्याला पूरक व प्रेरक असा हा ग्रंथ आहे.''[३]

''माझ्या संसार विश्व आहे। सर्व स्त्री–पुरुष बाप–माय
व्यवहार दृष्टीने समजून काय। पाहिजे ते ते बोललो।।
परी त्यातून एकचि घ्यावे। स्त्रियेस कोठे अव्हारावे।
कोठे माऊली म्हणोनी पाय धरावे। ओळखावे ते तारतम्ये।।''

तुकडोजी महाराजांचे संसार विश्वव्यापी आहे. जाती, धर्म, पंथ, भाषा, लिंग ह्या सर्व वैचारिक बंधनाच्या पलिकडील यांचे हे तत्त्वज्ञान सर्वव्यापी आहे. समाजातील स्त्रीची भूमिका दरवेळी बदलणारी असते. बहीण, आई, सून, ननंद, सासू अश्या विविध जबाबदाऱ्या पार पाडीत असतांना त्यांना विविध मार्गदर्शक तत्वाची आखणी ते करून देतात. ''असे तुकडोजी जनसेवेचे हृदयसम्राट होते जगद्व्याळ कार्याचे रहाट त्यांनी ओढिले आणि सर्वांना त्यात सहकार्य करण्यास देण्यास उद्दुक्त केले. आपल्या भजनातून, श्रमंतीतून, प्रवचनातून प्रेमभक्तीची परंपरा रुजविली ती जनमानसांत.''[४]

''समाजी जो पुरुषासि आदर। तैसाचि महिलांसि असावा व्यवहार।
किंबहुना अधिक त्यांच्या विचार। झाला पाहिजे समाजी।।
अरे! तुझ्याहून ती उत्तम वागते। समाजी उत्तम भाषण देते।
तुलाहि शहाणपण शिकवू जाणते। मग ती मागे कशाने?''

समाजात स्त्री व पुरुष दोघांचाही आदर हा जीवनाच्या सर्वच व्यवहारात सारखा असावा. देशाच्या स्वातंत्र्याबरोबर कायद्याने हे हक्क प्राप्त झाले आहेच. केवळ कायद्यानेच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातही ही पद्धत असावी. केवळ आज 'जागतीक महिला दिन' म्हणूनच हा केवळ उत्सव ठरू नये. तर दैनंदिन जीवनातही हा विचार खोलवर रुजला जावा ही अपेक्षा आहे. निसर्गाने मुलत: स्त्री–पुरुष दोघांनाही सर्व प्रकारची देणगी दिलेली आहेच. उत्तम भाषण, चित्रकला, साहस, विज्ञान, कुटुंबनिष्ठा, समाजनिष्ठा, संशोधन या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ही स्त्री कुठेही कमी नाही.'' स्त्री आणि संतती यांच्या उन्मत विकासाच्या दिशा यांना संयमात सापडतील असा जो मोलाचा सल्ला दिला. तुझा संसार सुखी करणे तुझ्याच हाती आहे. ती तुझीच संतती नाही तर देशाला उन्नत करणारे दिप आहेत. तेच जर सुखी, निरोगी, शूर, धीर वीर राहणार नाही तर तुझे नाव तुझ्या नावाबरोबरच देशाचे नाव कसे उन्नत होणार? त्यांनी गृहस्थाश्रमी असलेल्या माणसालाच हे प्रश्न विचारून चिंतन करावयास भाग पाडले.''[५] मुला–मुलींना ज्ञान–विज्ञानाचे आधुनिक शिक्षण द्यायला हवे, पण जेव्हा

''गावी भोजनाचे असती प्रसंग। स्वयंपाक करता यावा
यथा सांग। हे ही कला शिकवावी सप्रयोग। मुला–मुलींसि।।''

कुटुंबात, समाजकार्यात, लग्नविधीत व दैनंदिन जीवनात पाककला ही महत्त्वाची आहेच, ''असे शिक्षण एखाद्याला 'साधारण' वाटेल परंतु याचे जीवनात अग्रस्थान असते.''[६]

''नाही तरी जगणे जनावरासमान। होईल स्वयंपाक न येता।

असेही ते बजावतात. इथे प्रत्येकाचे जगणे, स्वावलंबी स्वाभिमानी असावे असा मौलिक विचार त्यामागे आहे. चांगले जगण्यासाठी माणसाला ही पाककला उद्युक्त करते. तुकडोजी जीवनाच्या सर्वांगीण विषयाला स्पर्श करीत असतांना स्वयंपाक, आहार हा विषय तेवढाच महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन ते करतात.

''विद्यागुरूहुनि थोर। आदर्श मातेचे अक्षर।
गर्भापासोनि तिचे संस्कार। बालकावरी।।

स्त्रीवरील गर्भसंस्कार हे किती महत्वाचे असतात. कोणत्याही सुदृढ राष्ट्राचे ते गुपीतच आहे. असे आपल्याला दिसते. यावर त्यांची निस्सीम श्रद्धा आहे. प्राचीन काळापासून 'मातृ देवो भव' असा गौरव का केला गेला हे स्पष्ट करताना स्त्रीची विविध रूप, रचना, जबाबदाऱ्या, स्वभावविशेष याचाही विचार करताना दिसतात. आजच्या काळातही २१ व्या शतकात राष्ट्रसंतांनी सांगितलेले विचार अत्यंत उपयोगी ठरतात. महिला उन्नतीसाठी गावागावात सुरू झालेले बचत गट यांच्यासाठी गृह उद्योग, कर्ज योजना, कौशल्य विकास, प्रशिक्षण ज्या आज आपल्याला गावागावात पाहायला मिळतात. ज्या योजनांची गरज तुकडोजी महाराजांनी त्या काळातच सांगून ठेवलेली होती. ही चिंता एक थोर समाजसुधारकांची होती. ही दृष्टी किती व्यापक सखोल होती. याची प्रचिती आज आपल्याला आल्याशिवाय राहणार नाही. ही महिला उन्नती एवढी वर्षे का होऊ शकली नाही? तर रुढी, परंपरा, स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन या मानसिकतेत या विनाशाची बीजे खरतर दडलेली आपल्याला दिसतात.

''सर्व सोयी पुरुषांकरिता। स्त्रियांसाठी सर्व व्यथा।
हे क्षण बोलते शास्त्र आता? द्यावे हाता झुंगारोनि।।
पुरूष उन्नतीस चढला। परि काहीच न कळे महिलेला।
तरी तो गावाचि एककल्ली झाला। नशिबी आला ऱ्हास भास।।''

अशा प्रकारचे निर्भीड, परखड विचार ते त्यांच्या ग्रामगीतेत महिला उन्नती या प्रकरणात सांगतात. ही स्त्री केवळ मातृ देवो भव म्हणण्यापर्यंत मर्यादित असू शकत नाही. केवळ पूजा–अर्चा करताना, विधीपूजा करण्यापुरती उपास, नवस करण्यासाठी नव्हे तर या स्त्रीला विकासाच्या नव्या वाटा दाखवाव्या लागतील. अशा प्रकारचे चिंतन त्यांच्या विविध ओव्यांमधून दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. तुकडोजींचे साहित्य विचार आजच्या सांप्रत काळातही तेवढेच मौलिक आहेत.

२. देशोन्नतीचा मार्ग ग्रामोन्नतीतून व महिलोन्नतीतूनच पुढे जातो.

३. ज्या समाजातील स्त्री सुशिक्षित असते तो समाज विकासाच्या नवनव्या संधीचा शोध घेतो.

**संदर्भ :**

१. विनोबा, 'शिक्षण तत्व आणि व्यवहार', प्रकाशक: करूणा कटाणे, परंधाम प्रकाशन, पवनार, २०१५, पृ. १४.
२. प्रा. डॉ. अशोक राणा, संपादक : 'ग्रामगीतेतील ग्राम निर्माण पंचक', जिजाई प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. १३.
३. तत्रैव, पृ. २२.
४. डॉ. जुल्फी शेख, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज', मध्यमा प्रकाशन, नागपूर, २००६, पृ. १०३.
५. तत्रैव, पृ. ११५.
६. डॉ. अक्षयकुमार काळे : (संपादक) 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, व्यक्ती आणि वाङ्मय', प्रकाशक, विसा बुक्स, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर, २००८, पृ. ६०.